# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.07.2025** **वारःमंगळवार**

---

- उपराष्ट्रपती धनखड यांचा प्रकृति अस्वास्थ्यामुळे पदाचा राजीनामा
- संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा पहिला दिवस गदारोळाचा, ऑपरेशन सिंदूरवर चर्चेसाठी १६ तासांचा अवधी देणार
- सर्जनशील अर्थव्यवस्थेसाठी महाराष्ट्र सरकारचा एफटीआयआय समवेत सामंजस्य करार
- २००६च्या मुंबई लोकल बॉम्बस्फोट प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला महाराष्ट्र सरकार सर्वोच्च न्यायालयात आव्हान
- बांग्लादेशात प्रशिक्षणार्थी विमान कोसळून २० जणांचा मृत्यू
- आणि
- महिला फिडे बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताची मास्टर दिव्या देशमुख उपांत्य फेरीत

**उपराष्ट्रपतीराजीनामा**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणामुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आरोग्याशी निगडीत कारणं आणि वैद्यकीय उपचारांसाठी आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचं जगदीप धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. आपल्या कार्यकाळात राष्ट्रपतींनी केलेल्या सहकार्यासाठी त्यांनी आभार व्यक्त केले आहेत. त्याचबरोबर धनखड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व केंद्रीय मंत्र्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे.

पंतप्रधानांचं अमूल्य सहकार्य आणि संसद सदस्यांकडून मिळालेला स्नेह आपल्या स्मृतींमध्ये कायम राहील असं धनखड यांनी म्हटलं आहे. परिवर्तनाच्या या युगात भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये योगदान देता आलं, ही आपल्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे असंही धनखड यांनी म्हटलं आहे.

**संसद**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या कालच्या पहिल्याच दिवशी पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी चर्चा करण्याच्या मागणीवरून विरोधी पक्षांनी दोन्ही सभागृहात घोषणाबाजी केली. त्यामुळे दोन्ही सभागृहांच्या कामकाजात व्यत्यय आला. पहलगाम हल्ल्याच्या मुद्द्यावर चर्चेसाठी सरकार तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू तसंच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लोकसभेत सांगितलं. मात्र तरीही विरोधकांनी गदारोळ सुरूच ठेवला; त्यामुळे सभागृहाचं कामकाज आधी तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लॅडिंग विधेयक २०२५ ला काल संसदेची मंजुरी मिळाली. जलवाहतूक कागदपत्रांची कायदेशीर प्रक्रिया सुलभ करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. लोकसभेत हे विधेयक यावर्षी मार्च महिन्यात मंजूर झालं होतं; काल राज्यसभेत हे विधेयक मंजूर झालं.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद भवन परिसरात वार्ताहरांशी संवाद साधला. हे अधिवेशन देशासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या सामूहिक यशाचा विजयोत्सव आहे, असं पंतप्रधान म्हणाले. संपूर्ण जगाने भारताच्या लष्करी सामर्थ्याची ताकद पाहिली आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्याने ठरवलेलं लक्ष्य पूर्णपणे साध्य झालं, असं पंतप्रधान म्हणाले. अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांच्या खासदारांनी सहकार्य करावं, अशी विनंती पंतप्रधानांनी यावेळी केली.

दरम्यान, संसद भवनात झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ऑपरेशन सिंदूरवर लोकसभेत चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विषयासाठी लोकसभेत १६ तासांचा वेळ देण्यात आला आहे. त्याशिवाय, प्राप्तीकर विधेयक २०२५ वर चर्चा करण्यासाठी कनिष्ठ सभागृहात १२ तास आणि राज्यसभेत त्यावर चर्चेसाठी ९ तासांचा वेळ देण्यात आला आहे.

**एफटीआयआयसमझोता**

भारतात वाढत्या सर्जनशील अर्थव्यवस्थेसाठी कुशल मनुष्यबळ विकसित करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत महाराष्ट्र सरकारने पुण्यातल्या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया म्हणजेच एफटीआयआय समवेत एक सामंजस्य करार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार  आणि एफटीआयआय चे अध्यक्ष आणि अभिनेता आर. माधवन यावेळी उपस्थित होते. सामान्य नागरिकही आशय निर्माता झाला आहे. या अर्थव्यवस्थेने १०० दिवसांत ९२ हजार कोटींवरून एक लाख कोटी रुपयांचा टप्पा गाठला आहे. त्यामुळेच निर्मात्यांच्या अर्थव्यवस्थेला तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित प्रतिभावान व्यक्तींची तसेच योग्य प्रमाणपत्रांची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

**बॉम्बस्फोट**

मुंबईत लोकल रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व १२ आरोपींना सबळ पुराव्याअभावी काल मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केलं. या १२ पैकी पाच आरोपींना फाशीची शिक्षा, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. न्यायालयाने या सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश दिले. या घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेलं साहित्य तसंच, कबुलीजबाब या तिन्ही पातळीवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अपयशी ठरल्याचं न्यायाधीश अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या खंडपीठाने या निकालावेळी स्पष्ट केलं. दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय आमच्यासाठी अत्यंत धक्कादायक आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्य सरकार या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचं त्यांनी काल मुंबईत माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>बांग्लादेशविमानदुर्घटना</u>**

बांग्लादेशच्या हवाईदलाचे शिकाऊ विमान काल महाविद्यालयाच्या आवारात कोसळल्याने वैमानिकासह वीस जणांचा मृत्यू झाला आणि १७१ जण जखमी झाले. बांग्लादेशच्या इंटर-सर्विसेस पब्लिक रिलेशन्सनने दिलेल्या माहितीनुसार, चीनी बनावटीचे हे विमान दुपारी प्रशिक्षण उड्डाणासाठी निघाले आणि लगेचच ते कोसळले. त्यानंतर सुरू असलेले बचावकार्य संध्याकाळी थांबवण्यात आल्याची माहिती दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटने बद्दल तीव्र शोक व्यक्त केला असून, या संदर्भात बांग्लादेशला सर्वतोपरी सहकार्य आणि मदत करण्याची तयारी दर्शवली आहे.

**<u>युएईसाखरकर</u>**

संयुक्त अरब अमिराती येत्या जानेवारी २०२६ पासून साखरयुक्त गोड पेयांवर लावण्यात येणाऱ्या उत्पादन शुल्काच्या धोरणात मोठा बदल करण्याच्या तयारीत असल्याची घोषणा युएईच्या अर्थमंत्रालय आणि संघीय कर प्राधिकरणाने केली आहे. नव्या नियमानुसार, सरसकट ५० टक्के कर लागू होण्याचा अंदाज असून १०० मिलीलीटर पेय पदार्थांमध्ये असलेल्या साखरेच्या प्रमाणाशी तो निगडीत असेल. साखरेच्या सेवनामध्ये घट होऊन आरोग्यदायी आहार सवयींचा अंगिकार आणि जीवनशैलीशी निगडीत लठ्ठपणा आणि मधुमेह या विकारांचा सामना या उद्देशाने हे धोरण राबवण्यात येणार आहे.

**<u>दलाई लामा स्वागत</u>**

कारगिलच्या जिल्हा प्रशासनानं काल लद्दाखमध्ये झंस्कार इथ १४ व्या दलाई लामांचं भव्य स्वागत केलं. यावेळी आंतरधर्मीय सद्भावना, शांततापूर्ण अस्तित्व याबरोबरच मनाला शिक्षित करण्याचं महत्व दलाई लामा यांनी यावेळी बोलतान अधोरेखित केलं. तसचं त्यांनी यावेळी झंस्कार मधील धार्मिक समुदायांमधील परस्पर आदर भावनेची प्रशंसा केली. यावेळी लेहचे प्रशासकीय अधिकारी, झंस्कार बौध्द संघटनांचे प्रतिनिधीं तसंच देश परदेशातील हजारो अनुयायी उपस्थित होते.

**<u>क्रीडाविधेयक</u>**

देशातील क्रीडा क्षेत्राला चालना देणारे राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात सादर होणार असल्याचे युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी काल सांगितलं. गोथिया विशेष ऑलिम्पिक करंडक २०२५च्या विजेत्यांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी खडसे बोलत होत्या.

तसेच, राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य सेवन प्रतिबंधक सुधारणा विधेयकाचा उद्देश संघ, खेळाडू आणि प्रशिक्षकांच्या समस्या दूर करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले. आगामी विधेयकांमधील धोरणांमुळे क्रीडा क्षेत्राची पायाभूत सुविधा भक्कम होईल.

फूटबॉल साफ कप

फुटबॉल मधील १७ वर्षाखालील साफ अजिंक्यपद २०२५ स्पर्धेत भारताचा सामना ब गटामधील पारंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तान, तसंच भूतान आणि मालदीवशी होणार आहे. श्रीलंका,बांगलादेश आणि नेपाळ अ गटात खेळतील. ही स्पर्धा १५ ते २७ सप्टेंबर दरम्यान श्रीलंकेतील कोलंबो इथं होणार आहे.

**तेंडूलकर-अंडरसन चषक**

इंग्लंडविरुद्धच्या अँडरसन तेंडूलकर चषकाच्या उर्वरित दोन सामन्यांमधून अष्टपैलू खेळाडू नितीशकुमार रेड्डी गुडघ्याच्या दुखापतीमुळ बाहेर पडत असल्याचं भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं काल जाहीर केलं. तर मँचेस्टर इथं होणार्या इंग्लंड विरुद्धच्या चौथ्या सामन्यातून वेगवान डावखुरा गोलंदाज अर्शदीप सिंग डाव्या अंगठ्याला झालेल्या दुखापातीमुळे बाहेर पडला असल्याचंही जाहीर केलं. चौथी कसोटी उद्या मँचेस्टर मधील एमिरेट्स ओल्ड ट्रॅफर्ड इथं सुरु होणार आहे. ५ सामन्यांच्या या मालिकेत यजमान इंग्लंड २-१ नं आघाडीवर आहे.

बुद्धिबळ **फिडे**

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताची आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख हिनं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत पोहोचलेली ती दुसरी भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. रॅपिड टाय ब्रेक मध्ये दिव्यानं आपल्याच देशाची ग्रँड मास्टर हरिका द्रोणवल्लीचा २-० असा पराभव केला. आता ती अंतिम चारच्या लढतीत आपल्याच देशाची ग्रँड मास्टर कोनेरू हम्पी सोबत सामील झाली असून उपांत्य फेरीत दिव्याचा सामना चीनच्या ग्रँड मास्टर तानझोंगीशी होणार आहे. तर आज संध्याकाळी हम्पीचा सामना दुसरी चिनी ग्रँड मास्टर लेई टिंगजीशी होणार आहे. दरम्यान, ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या बुद्धिबळ विश्वकरंडक २०२५ स्पर्धेचं यजमानपद भारत भूषवणार आहे. या संदर्भात लवकरच घोषणा करण्यात येईल, असे फिडे संघटनेने सांगितले आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**